# आत्महत्याग्रस्त शेतकरी महिलेची व्यथा

देशात शेतकऱ्याच्या ज्या आत्महत्या होत आहे. महाराष्ट्रातील वर्धा जिल्हातील चिस्तुर या गावातील आत्महत्याग्रस्थ महिला 1. श्रीमती. मिना अशोकराव भालेराव रा. चिस्तुर ता. आष्टी जि. वर्धा वय 45 वर्ष 2. श्रीमती शुभांगी मदनराव वानखडे रा. चिस्तुर माझ्या कुटुंबामध्ये माझ्या पतीने शेतीला कंटाळुण सन. 2014 – 15 या वर्षात आत्महत्या केली असुन माझे कुटुब फक्त शेतीवर अवलंबुन होते, दरवर्षी होणारी सततची नापिकी दुष्काळ, व शेतीमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे माझी आर्थिक परिस्थिती दिवसेंनदिवस ढासळत गेली. अल्पभुधारक शेतकरी त्यामुळे उत्पन्न फारच कमि बॅकेचे कर्ज व उसनवारी सावकारी कर्ज वाढत गेले. मुलाचे – मुलींचे शिक्षण, खर्च मुलीचे लग्न यामुळे आर्थिक स्त्रोत कमि दविसेंनदिवस माणसिक तनावामध्ये जिवण जगावे लागले त्यामुळे वाढत्या जबाबदाऱ्या कुटुंबाचे पोषन ईत्यादी अनेक कारणामुळे तणावास सामोर जावे लागले. शेवटी तनाव सहन न झाल्यामुळे आत्महत्तेस प्रवृत्त व्हावे लागले.

कुटुंब प्रमुखाची आत्महत्या झाल्यामुळे पुढील जबाबदारी वाढत गेल्या यानंतर जिवनात सावरण्या करिता कुणाचातरी मदतीचा हात आवश्यक होता. अशा संकटकाळी व्यक्तिला मदत करण्याच्या दृष्टीने सामाजिक संस्था भारतीय बहुउदेशिय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था,चिस्तुर ता. आष्टी जि. वर्धा या सामाजिक संस्थेने पुढाकार घेवुन मदतीचा हात देण्याचे ठरविले अशा परिस्थितीमध्ये संस्थेने मुलाचे शिक्षण व घराचा दैनंदीन खर्च चालावा या करिता शाषणाच्या विविध योजनेतुन पुरेशी मदत केली. सामाजिक दायीत्व सांभाळण्यासाठी अशा कुटुंबाना मदत करण्याचे आव्हाण स्विकारले नाम या सामाजिक संस्थेशी सपंर्क साधुन आर्थिक मदत 15 हजार रूपये मिळवून दिले. घरगुती साहीत्य काही सामाजिक योजनेतुन मिळवुण दिले, आत्महत्या ग्रस्त कुटुंबाची आथिक स्थिती सुधारावी व कुठेतरी कायापालट व्हावा या हेतुने अशा कुंटुबांना आजही मदतीची गरज आहे. भविष्यात अशी कुंटुबे स्वाभीमानाने जगावी या करीता. भारतीय बहुउदेशिय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था,चिस्तुर सर्वाना जाहीर आव्हाण करित आहे कि, दानशुर सामाजिक संस्था व शासन यांनी पुढे येवून अशा कुटबांना मदत करावी.

अध्यक्ष
भारतीय बहुउद्देशिय खादी व
ग्रामोद्योग शिक्षण संस्था, चिस्तुर
ता.आष्टी जि वर्धा

आज देशामध्ये शेतकऱ्याच्या हवालदील परिस्थितीमुळे शेतकरी खचलेला आहे. घरातील कमावता व्यक्ती गेल्यामुळे कुंटुब पुर्णपणे निराधार झाले आहे. शेतकऱ्याचा होणाऱ्या आत्महत्या जनु एक कुंटुबाला दारीद्राचा शापच असल्याचे जानवते अशा बिकट परिस्थितीमुळे आत्महत्याग्रस्थ शेतकऱ्याची पत्नी अपत्य कुंटुंब निट सांभाळु शकत नाही मुलाबांळाचे शिक्षण पूर्ण करू शकत नाही. एवढेच काय तर मुलीचे लग्न करण्याची सुद्धा तिच्यात हिम्मत नसते. वाईट परिस्थीतीत जिवण जगावे लागत. दिवसेंनदिवस दारिद्रयाला सामोर जावे लागतअशा वेळी कुणाचा तरी मदतीचा हात अशा निराधार कुंटुंबाना मिळणें गरजेचे असंते.

अशा वेळी शासन सवयंम सेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांनी सामोर येवून त्यांना आधार देणे अगत्याचे असते अशा परिस्थिीमध्ये स्वयंम सेवी संस्थानी पुढाकार घेण्याचे महत्वाचे कार्य भारतीय बहुउदेशिय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था,चिस्तुर या संस्थेने स्वयंमस्फुर्तीने पुढाकार घेवून पुर्ण करित आहे. परिसरात झालेल्या शेतकरी आत्महत्या कुंटुबांना प्रत्यक्ष भेट देवून त्याच मनोगत जानुन घेवुन त्या कुंटुबाच्या व्यथा खरोखरच दिनवानी दिसुन आल्या त्यामध्ये दोन कुंटुबाची झालेली दैनावस्था अधिकच आहे. चिस्तुर या गावातील एक कुटुंब निराधार व आत्महत्या ग्रस्त श्रीमती. मिना अशोकराव भालेराव व शुभांगी मदन वानखडे तरूण वयात पतीने आत्महत्या केल्यामुळे संपूर्ण कुंटुब निराधार झाले आहे. मुलगा लहान मुलीचे लग्न या सर्व जबाबदारीने होरपळलेली महिला त्या महिलेला कुणाचा तरी मदतीचा हात हवा होता. अशा वेळी भारतीय बहुउदेशिय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था,चिस्तुर संस्थेने पुढाकार घेवून शासनाच्या योजनेचा लाभ पदरी पाडुन देण्याचे त्याचप्रमाणे नाम सारख्या संस्थेच्या मदतीने स्त्रोत सर्व बाबीचा पाठपुरावा आर्थिक मदत कौटुबीक वस्तुची मदत मनोबल वाढविण्याच्या हेतुने. आवश्यक शिबीर घेवुण व प्रबोधन करूण प्रशिक्षणाचे प्रयोजन करूण उद्योगातुन रोजगार त्या कुंटुबाला कसा प्राप्त होईल हे लक्ष सामोर ठेवुन आत्महत्याग्रस्थ कुटुंबाना या संस्थेने परीपूर्ण मदत केली.

आणी आज समाजाविषयी आपले श्रेय समजुन पुढे हि निरंतर त्यांना सर्वतोपरी मदतीचा हात देणे आहे. त्याकरिता दानशुर व्यक्ति, सामाजिक संस्था व जाणिवपूर्ण संस्थेनी शासनाने आपला आर्थिक सहभाग यां संस्थेच्या माध्यमातुन पुरविण्याचा मानस आहे. आपणास नम्र निवेदन भारतीय बहुउदेशिय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था,चिस्तुर या संस्थेला मदत करून आपल्या परीने मदतीचा हात द्यावा जेने करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे कुंटुंब स्वाभिमानाने व हिम्मतीने जगण्याची ताकद त्याच्यात निर्माण होईल.

(signature)

अध्यक्ष
भारतीय बहुउद्देशिय खादी व
ग्रामोद्योग शिक्षण संस्था, चिस्तुर
ता.आष्टी जि वर्धा




